दैनिक
# गोवादूत
आपली माणसं, आपलं दैनिक
२ रु.
▸ गोवादूत इंटरनेटवर : www.goadoot.blogspot.com
वर्ष : ३ ▸ अंक : ३५९ ▸ शुक्रवार, १६ मे २००८ ▸ पाने १२

# सावधान! 'पासवर्ड'ची चोरी आता सहज शक्य!



पणजी, दि. १५ (प्रतिनिधी) : 'इंटरनेट नॅटवर्कींग'मध्ये अनेक त्रुटी असल्याने तुमच्या संगणकावरील कोणतीही गुप्त माहिती आणि तुमचा 'पासवर्ड' दहा मिनिटांत चोरीला जाऊ शकतो. तसेच, तुम्ही तुमच्या संगणकावर अश्लील फोटो पाहत असल्यास आणि लोकांना धमकावण्यासाठी 'ई मेल' पाठवत असल्यास अर्ध्या तासात तुमच्यावर तुरुंगांतील जेवण जेवण्याची पाळी येऊ शकते.

गेल्या काही वर्षात इंटरनेटद्वारे अनेक सायबर गुन्हे वाढत असल्याने काही आयआयटी तज्ज्ञांनी याची माहिती देऊन जागृती करण्याचा विडा उचलला आहे. 'हॅकिंग' हा प्रकार वाईट आहे, तसेच त्यामुळे होणाऱ्या गैरफायद्यांचेही शिक्षणही दिले जात आहे.

खडकपूर आयआयटी मध्ये शिक्षण घेतलेल्या स्वपन पुरकेत यांनी सर्व आयआयटीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी गोव्यातील रायबंदर येथील गोवा इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये खास व्याख्यान आणि प्रात्यक्षिकाचे आयोजन केले आहे. यात सहभागी होण्यासाठी अनेक राज्यातील आयआयटीचे शिक्षण घेणारी असे सुमारे १२० विद्यार्थी गोव्यात दाखल झाले आहेत. दि. २२ मे पर्यंत या ठिकाणी विद्यार्थ्यांना ''नेटवर्क मॅनेजमेंट आणि एथिकल हॅकिंग'' याची पूर्ण माहिती करून दिली जाणार आहे. एका संकेतस्थळावर नाव नोंदणी करून या व्याख्यानासाठी हे विद्यार्थी याठिकाणी जमले आहेत.

आपला पासवर्ड आणि माहिती गुप्त ठेवण्यासाठी कशी काळजी घ्यावी, याविषयी विचारले असता, आपल्या मेलवर आलेल्या कोणताही अनोळखी मेल न उघडताच 'डिलीट'

...पान २ पाहा ▸

## 'पासवर्ड'ची चोरी आता सहज शक्य!

करून टाका. प्रश्न विचारून आलेल्या 'मेल'ला, परत उत्तर पाठवू नका, तसेच सायबर कॅफेमधील संगणकावर तुम्ही जात असल्यास मेल उघडण्यासाठी सुरुवातीला किमान चारवेळा चुकीचा पासवर्ड टाका, आणि मगच खरा पासवर्ड टाइप करून तो उघडा, असा सल्ला यावेळी प्रा. विठ्ठल सुखठणकर यांनी दिला.